CNR No. MHRG040006842025

<u>विवाह अर्ज क्र. ११९/२०२५ मधील निशाणी क्र.७ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जात दुरूस्ती करण्याकरिता दाखल केलेला आहे. सामनेवाला यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले.

२. अर्जदारांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, अर्जदार व सामनेवाले यांच्यात समझोता झाला असून त्यांनी संमतीने घटस्फोट घेण्याचे ठरविले आहे व त्याअनुषंगाने मूळ अर्जात अर्जदार क्र.१ व २ तसेच अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) अन्वये नमूद करायचे असून मूळ अर्जातील परिच्छेद क्र.३ ते ४५ वगळून प्रस्तुत अर्जातील परिच्छेद क्र.३ ते ९ नमूद करणे आवश्यक असुन दुरूस्ती करण्याची परवानगी मिळावी. सामनेवाले यांचे वि. अधिवक्ता यांनी अर्ज मंजूर करण्यास नाहरकत दिली.

३. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच अर्जदार व सामनेवाले यांचे वि.अधिवक्ता यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसून येते की, अर्जदारांनी सदरहू अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ कलम १३(१)(ia) अन्वये दाखल केलेला असून प्रस्तावित दुरूस्ती केल्यास अर्जाच्या स्वरूपात कुठलाही बदल होत नाही. प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. परिणामी खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१.	अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२.	अर्जदारांना मुळ अर्जात प्रार्थित दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.03.11 17:53:34 +0530

पनवेल
दिनांक ०९/०३/२०२६.

**(ए.एस. बडगुजर)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
पनवेल.